**MHKO100003022018**

# आदेश निशाणी क्र. २१

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २ नियम २ प्रमाणे स्वतंत्र/वेगळा दावा दाखल करणेकरीता परवानगी मिळणेकरीता सादर केलेला आहे.

२. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजुचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३. वादी यांचा अर्ज वाचला. प्रतिवादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे निशाणी क्र. २८ वर दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, अर्जातील सर्व मजकुर चुकीचा व बेकायदेशिर आहे. वादी यांना मुंबई येथील मिळकतीचे वाटप प्रस्तुत दाखल दावेमध्ये सुध्दा न्यायालयाचे परवानगीने करता येते. पुन्हा दुसरा दावा करणेचे कोणतेही कायदेशिर गरज नसताना केवळ प्रतिवादी यांना आर्थिक व मानसिक त्रास देणेचे हेतुने दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना आपले कायदेशिर हक्कापासून वंचित ठेवणेकरीता सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करणेची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी सदरचा दावा, दावा मिळकतींचे वाटप होवून स्वतंत्र कब्जाकरीता व कायम मनाईकरीता दाखल केला आहे. दाव्यात मिळकती १अ ते १क ह्या मौजे

गडहिंग्लज येथील आहेत. वादी यांचे अर्जात असे कथन आहे की, दाव्यात सामील असलेल्या मालमत्तेव्यतिरिक्त काही स्थावर मिळकती ह्या ऐरोली, नवी मुंबई येथे आहेत. त्यामुळे नवीन दावा ठाणे येथे दाखल करणेस परवानगी मागीतली आहे.

५. वादी यांनी प्रस्तुत अर्जामध्ये कोणत्या मिळकती ऐरोली, नवी मुंबईमध्ये आहेत याबाबत योग्य स्पष्टीकरण दिलेले नाही. प्रतिवादी यांनी त्यांची कैफीयत नि.क्र.१९ वर दिनांक ०९/०४/२०१९ रोजी दाखल केली आहे. त्यामध्ये त्यांनी Non-joinder of Necessary Properties and Hotch Potch या कायदेशिर तत्ताची बाधा येते अशी हरकत घेतली आहे. नवी मुंबई येथे वादी यांच्या मिळकती आहेत याची माहिती त्यांना पुर्वीपासून होती. परंतु दावा दाखल करताना त्यांनी या मिळकती दाव्यामध्ये समाविष्ट केल्या नाहीत. असे असताना वादी यांनी सदरचा अर्ज दिनांक २३/०६/२०२२ रोजी दाखल केलेला आहे. म्हणजेच दावा दाखल केल्यानंतर जवळजवळ ४ वर्षांनी दाखल केलेला आहे. प्रकरणात निशाणी क्र. २६ वर मुद्दे काढण्यात आले आहेत. प्रतिवादी यांनी आपल्या म्हणण्यामध्ये मुंबई येथील मिळकतीचे वाटप प्रस्तुत दावेमध्ये सुध्दा न्यायालयाचे परवानगीने करता येते असे म्हणणे दिले आहे. यावरुन असे दिसून येते की, नवी मुंबई येथील मिळकतीबाबत वादी यांना याच दाव्यात दाद मागता येवू शकते. त्यासाठी वेगवेगळया ठिकाणी दावे दाखल करण्याची आवश्यकता नाही. त्याबाबत दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये तरतुद आहे. सदरचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. याउलट वादी यांचा अर्ज नामंजूर केल्यास एकाच दाव्यात वादी व प्रतिवादी यांच्या सर्व मिळकतींचे गुणदोषावर न्यायनिर्णय करणेस मदत होणार आहे. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**१.** अर्ज नामंजूर करणेत येत आहे.

**२.** या अर्जाचा खर्च मुळ अर्जात समाविष्ट करण्यात येतो.

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक – २२/०२/२०२४

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज